# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ४८३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०६/०८/२०१६.

**१) काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०८/२०१६ रोजी २०.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी जनार्धन नत्थु टांगले वय ४८ वर्ष, रा. पांजरा ह. मु. देव्हाळी हा आपल्या मेडीकल स्टोर्स मध्ये बसला असता यातील आरोपी हा दारु पिवुन दुकाना समोर येवुन ''साले दुकान बंद कर असे म्हटले'' असता त्यास दुकान बंद करण्यास वेळ आहे असे बोलले असता आरोपीने दुकानात त्याचे हातातील काठीसह आत प्रवेश करुन फिर्यादीचे डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. परिक्षण रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५२,३२४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. सोनपीपरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०८/२०१६ रोजी १५.४५ वा. दरम्यान फिर्यादी धर्मेन्द्र तेजराम सोनवाने वय २३ वर्ष, रा. सिहोरा आरोपीस तुझ्या शेळया माझ्या शेतात जावुन तुरीचे झाडे खावुन माझे नुकसान केले आहे. असे हटकले असता यातील आरोपीने फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ करुन त्याचे जवळ असलेल्या बासाने काठीने फिर्यादीचे डावे पायाचे मांडीवर डावे डोळयावर मारुन दुखापत केली व पुढे पाहुण घेण्याची धमकी दिली. असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०८/२०१६ रोजी १४.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन अडयाळ येथे आमरोडवर उभी करुन येणा–या वाहतुकीस अडथळा करीत असतांना मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. बोरकर पो.स्टे. अडयाळ यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

४) विषारी सर्पद्वंशाने इसमाचा मृत्यु :—

दिनांक ०५/०८/०१६ रोजी १२.०० वा. दर. यातील मृतक सुभम केशव खांडेकर वय २७ वर्ष, रा. सातलवाडा हा आपल्या घरासमोरील शेतामध्ये रोवणा झाला असल्याने पाणी पाहण्याकरीता गेला असता व परत बांधिच्या धु—याने येत असतांना त्याला कोणत्यातरी विषारी सापाने चावा घेतल्याने डाव्यापायाला, उजव्या हाताला, अंगठीला रक्त दिसल्याने त्यास बेशुध्द अवस्थेत उप—जिल्हारुग्णालय साकोली येथे आणले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी सफौ. गोळंगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) उपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु . :—

दिनांक ०३/०८/०१६ रोजी १४.०० वा. दर. यातील मृतक नाजुकाइबाई श्रावण बावनकर वय ६२ वर्ष, रा. गांधी नगर तुमसर हिची प्रकृती बिघडल्याने तिला तिचे नातेवाईकांनी सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. ना. हलमारे पा. स्टे तुमसर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

६/८/१६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.